महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सअॅप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती
# महाराष्ट्र जनशक्ती
मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २४० वा | दिनांक : २०/०७/२०२५ | वार : रविवार

## मराठीची खरी काळजी भाजपलाच



**नवी दिल्ली :**मराठी आणि हिंदी भाषेच्या मुद्द्यावर राज्यात रंगत असलेला वाद आता अधिकच तीव्र होत चालला आहे. मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मीरा-भाईंदरमध्ये मराठीचा मुद्दा पुन्हा जोमात उचलून धरल्यानंतर, आता भाजपचे खासदार व लोकप्रिय गायक-अभिनेता मनोज तिवारी यांनी थेट राज ठाकरे यांच्यावर घणाघाती टीका केली आहे. 'राज ठाकरेंसोबत जो जाईल, तो महाराष्ट्रात समाप्त होईल,' असा थेट इशारा त्यांनी दिला असून, मराठी अस्मितेचा खरा आदर भाजपच करत असल्याचा दावा केला आहे.

मनोज तिवारी म्हणाले की, या देशात आणि विशेषतः महाराष्ट्रात भाषिक आणि प्रांतीय एकतेचा जो भाईचारा आहे, तो मोडण्याचा प्रयत्न करणारा हा एक 'प्राणी' आहे. राज ठाकरेला कोणीही काहीही बोलू दे, पण जे राजकारणाच्या कचराकुंडीत गेले आहेत, त्यांना पुन्हा उचलण्याचा प्रयत्न कुणी करू नये, हीच प्रार्थना.

मनोज तिवारी म्हणाले की, राज ठाकरे आणि त्यांच्या सारखे लोक मराठी संस्कृतीचा केवळ दिखावा करतात. मात्र भारतीय जनता पार्टीच खऱ्या अर्थाने मराठी भाषेच्या अस्मितेचे जतन करते. त्यामुळे महाराष्ट्रातील जनता राज ठाकरे यांना स्वीकारत नाही. आणि जे त्यांच्या सोबत जातील, ते देखील महाराष्ट्राच्या राजकारणातून संपतील.

उत्तर भारतात येऊन दाखवा,तुम्हाला पटक-पटक के मारेंगे असे आव्हान झारखंडचे भाजप खासदार निशिकांत दुबे यांनी ठाकरे बंधूंना दिले होते. त्यावर दुबेंना प्रतिआव्हान देत तुम्ही मुंबईत येऊन दाखवा, तुम्हाला मुंबईच्या समुद्रात डुबे-डुबे के मारेंगे, असा इशारा मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी शुक्रवारी दिला. हिंदी सक्तीचा विरोध आणि मीरा-भाईंदर येथील मनसेच्या आंदोलनानंतर प्रथमच राज ठाकरे यांनी शुक्रवारी जाहीर सभा घेतली. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हिंदीसाठी पेटलेत अशी टीका त्यांनी फडणवीस यांच्यावर केली.

राज ठाकरे म्हणाले, त्रिभाषा धोरणानंतर महाराष्ट्रातील वातावरण पेटलं असून सरकारला शेवटी हे धोरण मागे घ्यावं लागलं. त्यानंतर मुंबईत मराठी-हिंदी वाद पाहायला मिळाला. या वेळी त्यांनी खासदार निशिकांत दुबे यांचा चांगलाच समाचार घेतला. ते म्हणाले, काही दिवसांपूर्वी झारखंडचा खासदार दुबे हा आम्हाला म्हणतो की, तुम्ही आमच्याकडे येऊन दाखवा, तुम्हाला पटक पटक के मारेंगे. या खासदारावर केस झाली का? याचा विचार तुम्ही आम्ही करायला हवा. कारण या नेत्यांना बोलतांना माहिती असते की, सरकार आपल्या पाठिशी आहे. त्यामुळे ही अशा प्रकारची भाषा करत असतात. पण दुबे मी तुम्हाला सांगतोय की, तुम्ही मुंबईत येऊन दाखवा. तुम्हाला मुंबईच्या समुद्रात डुबे डुबे के मारेंगे.

बिहारमधील लोकांना माझं एक विचारणं आहे- २८ सप्टेंबर २०११ हिंमतनगरजवळ १४ महिन्याचा मुलीवर बलात्कार झाला. त्यानंतर बिहारी लोकांना मारहाण केली . जवळपास २० हजार लोकांना गुजरातमधून हाकलून लावले. तेव्हा तुम्हाला या घटनेच्या बातम्या दिसल्या का? असा थेट सवाल राज ठाकरे यांनी केला.

या हिंदीसाठी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पेटलेत. याचे काही मला समजू शकले नाही. हिंदी कुणाचीही राजभाषा होऊ शकत नाही. हिंदी ही इकडच्या तिकडच्या भाषा मिळून २०० वर्षांपूर्वी तयार झालेली भाषा आहे. हिंदीने जवळपास १५०० भाषा मारल्या. आणि आपल्या मराठीला २००० वर्षांचा इतिहास आहे. तर मग तुम्ही कोणत्या दिशेने चालला आहात? असा सवाल त्यांनी केला.

## धाराशिवमध्ये मराठा समाज आक्रमक- जात वैधता प्रमाणपत्राच्या मुद्यावरून पालकमंत्र्यांना घेराव



**धाराशिव :** जिल्ह्यात कुणबी पुरावे असतानाही जात वैधता प्रमाणपत्र मिळत नसल्याने संतप्त झालेल्या मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी आक्रमक होत जिल्ह्याचे पालकमंत्री प्रताप सरनाईक यांना शुक्रवारी थेट घेराव घातला. धाराशिव शहरातील रेस्ट हाऊसच्या परिसरात हा प्रकार घडला असून, यावेळी मंत्री सरनाईक आणि आंदोलकांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याचे पाहायला मिळाले. यावर संतप्त झालेल्या प्रताप सरनाईक यांनी संबंधित जात वैधता समितीच्या अधिकाऱ्याला त्वरित फोन लावून जोरदार खरडपट्टी काढली.

राज्य विधिमंडळाच्या अधिवेशनाची सांगता होताच धाराशिवचे पालकमंत्री प्रताप सरनाईक हे जिल्ह्याच्या दौऱ्यावर गेले होते. यावेळी मंत्री संजय शिरसाट यांच्या विभागाच्या प्रश्नांसाठी प्रताप सरनाईक यांना मोठ्या रोषाला सामोरे जावे लागले. मराठा समाजाला दिली जाणारी कुणबी प्रमाणपत्र आणि जात वैधता प्रमाणपत्रे दिली जात नसल्याने मराठा समाजाचे कार्यकर्ते आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. धाराशिवमध्ये रेस्ट हाऊसच्या बाहेरच मंत्री प्रताप सरनाईक यांना घेराव घालून आमचे प्रश्न सोडवा मगच रेस्ट हाऊसमध्ये जा, असा आक्रमक पवित्रा घेत, आंदोलकांनी जवळपास १०-१५ मिनिटे आंदोलकांनी पालकमंत्र्यांचा रस्ता अडवून धरला होता. यावेळी आंदोलक आणि मंत्री सरनाईक यांच्या शाब्दिक चकमक झाल्याचे पाहायला मिळाले.

धाराशिव जिल्ह्यात अनेक अर्जदारांकडे कुणबी असल्याचे पुरावे असूनही जात वैधता समितीकडून प्रमाणपत्रे नाकारली जात आहेत. यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत आहे. प्रवेश प्रक्रिया सुरू असताना प्रमाणपत्र न मिळाल्याने अनेकांना प्रवेश व शिष्यवृत्तीपासून वंचित राहावे लागत आहे, असा आरोप मराठा समाजाच्या कार्यकर्त्यांनी केला आहे.

आंदोलकांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर मंत्री सरनाईक यांनी जात वैधता समितीच्या अधिकाऱ्यांना फोन करून खडसावले. "या प्रकरणात मी याआधीही दोन वेळा फोन केला होता. त्यावेळी मराठा समाजाच्या ज्या काही समस्या आहेत त्या सोडवण्याचे आश्वासन तुम्ही दिले होते. दीड महिना उलटून गेला तरी अजून निर्णय का घेतले नाहीत?" असा सवाल करत त्यांनी अधिकारी यांच्या कामकाजावर नाराजी व्यक्त केली.

तुमच्यामुळे शासनाला आणि आम्हाला त्रास होत असेल तर हे चुकीचे आहे. या सगळ्या गोष्टीला तुम्ही जबाबदार आहात. तुमच्याकडे चार्ज असतानाही काही कार्यवाही का करत नाही? तातडीने या प्रकरणात लक्ष घाला आणि नियमानुसार कार्यवाही करा, असा आदेश प्रताप सरनाईक यांनी अधिकाऱ्यांना दिला.

## एकनाथ शिंदे सरकार हनीट्रॅपमुळे आले : काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचा खळबळजनक दावा



**मुंबई :** महाविकास आघाडीचे सरकार उलथावून सत्तेत आलेले एकनाथ शिंदे सरकार हनीट्रॅपमुळे आल्याचा खळबळजनक दावा काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी शनिवारी केला. मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत हनीट्रॅपचे आरोप फेटाळले. पण सरकार व विरोधकांकडे याविषयी मोठी माहिती आहे. त्याचे पुरावे द्यायचे झाले तर तिकीट आम्हाला तिकीट लावावे लागेल. विशेषतः एकनाथ शिंदे यांचे सरकाही नाशिकच्या सीडीमुळेच आले होते, असे ते म्हणालेत. वडेट्टीवार यांच्या या आरोपामुळे राजकीय वर्तुळात एकच खळबळ माजली आहे.

काँग्रेस नेते नाना पटोले यांनी गुरूवारी विधानसभेच्या पटलावर मंत्रालय, नाशिक व ठाणे हे हनीट्रॅपचे केंद्र झाल्याचा आरोप केला होता. या प्रकरणी एक पेन ड्राईव्हही सभागृहात दाखवले होते. विधानसभा अध्यक्षांनी सरकारला हनीट्रॅपच्या मुद्यावर निवेदन करण्याचे सांगितले. पण त्यांच्या सूचनेनंतरही सरकारने त्यावर निवेदन केले नाही. या प्रकरणी महाराष्ट्राची बदनामी होत आहे. मंत्रालय, नाशिक व ठाणे हे हनीट्रॅपचे केंद्र बनले आहे. राज्याचे महत्त्वाचे दस्तऐवज या समाजविघातक संघटनाच्या हाती जात आहेत. मी कुणाचेही चारित्र्यहनन करत नाही. माझ्याकडे पेन ड्राईव्हही आहे. मला ते दाखवायचे नाही. पण एवढ्या गंभीर प्रकरणात सरकार निवेदन करण्यास तयार नाही हा माझा आरोप आहे, असे ते म्हणाले होते.

नाना पटोले यांच्या या विधानानंतर मुख्यमंत्र्यांनी त्यांचे आरोप फेटाळले होते. ना हनी आहे ना ट्रॅप. आमच्यापर्यंत नाना पटोलेंचे बॉम्ब पोहोचलाच नाही, असे ते या आरोपांची खिल्ली उडवत म्हणाले होते. या पार्श्वभूमीवर विजय वडेट्टीवार यांनी उपरोक्त दावा केला आहे. वडेट्टीवार म्हणाले, मुख्यमंत्री काल हनीही नाही आणि ट्रॅपही नाही असे म्हणाले. पण त्यासंदर्भात सरकार व विरोधकांकडे फार मोठी माहिती आहे. कुणाच्या वैयक्तिक आयुष्यात डोकावण्याचा कुणाला अधिकार नाही म्हणून आम्ही शांत आहोत. पण मागच्यावेळेस शिंदे सरकार जे आले, ते अशाच नाशिकच्या प्रकरणामुळे आले. जे काही सत्तापालट झाले ते सीडीमुळेच झाले, एवढे मोठे ते प्रकरण आहे.

बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० जुलै २०२५

## करिअर घडविण्यासाठी एआय आणि सोशल मीडियाचा योग्य वापर करावा - मा. यशवंत शितोळे



**उमरगा (प्रतिनिधी)** : “आजच्या डिजिटल युगात विद्यार्थ्यांनी कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) आणि सोशल मीडियाचा सकारात्मक आणि योग्य वापर करून आपले करिअर घडवावे,” असे प्रतिपादन महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान सहाय्यता केंद्राचे अध्यक्ष मा. यशवंत शितोळे यांनी केले. ते श्री छत्रपती शिवाजी महाविद्यालयात १८ जुलै रोजी आयोजित "करिअर कट्टा " उपक्रमांतर्गत झालेल्या विद्यार्थी संवाद मेळाव्यात प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. संजय अस्वले होते. पुढे बोलताना मा. यशवंत शितोळे यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, करिअर नियोजन, डिजिटल प्लॅटफॉर्मचा वापर, आणि स्वत:च्या कौशल्यांचा विकास यावर मार्गदर्शन केले.प्राचार्य डॉ. संजय अस्वले यांनी प्रास्ताविक केले. यावेळी त्यांनी महाविद्यालयातील करिअर कट्टाच्या माध्यमातून चालणाऱ्या उपक्रमाची माहिती दिली. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. विलास इंगळे, डॉ. पद्माकर पिटले तसेच धाराशिव येथील प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, डॉ. विनोदकुमार वायचळ, प्रा. साखरे, डॉ. नितीन पडवळ, डॉ. अर्जुन कटके, डॉ. किरण लोमटे, डॉ. मनोज सोमवंशी, प्रा. एन. जे. पवार, डॉ. अशोक पदमपल्ले, करिअर कट्टाचे महाविद्यालयीन समन्वयक डॉ. समाधान पसरकल्ले आणि डॉ. चंद्रसेन करे यांनी प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. अनिशा सुरवसे यांनी केले तर गणेश मोरे यांनी आभार मानले.




# माधवराव पाटील महाविद्यालयात वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची शपथ



**मुरूम (प्रा. सुधीर पंचगल्ले)** : येथील श्री माधवराव पाटील महाविद्यालयाच्या परिसरात राष्ट्रीय सेवा योजना विभागांतर्गत हरित धाराशिव अभियानांतर्गत एक पेड मा के नाम वृक्षारोपण व वृक्षसंवर्धनाची कार्यक्रम शनिवारी (ता. १९) रोजी घेण्यात आला. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक सपाटे, उपप्राचार्य डॉ. चंद्रकांत बिराजदार, राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. शिला स्वामी आदींच्या प्रमुख उपस्थिती होती. प्रारंभी महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करून वृक्षसंवर्धनाची शपथ घेण्यात आली. प्रा. डॉ. विलास खडके, डॉ. नरसिंग कदम, डॉ. विनायक रासुरे, डॉ. मुकुंद धुळेकर, डॉ. किरणसिंग राजपूत, डॉ. महेश मोटे, डॉ. राम बजगिरे, डॉ. जयश्री सोमवंशी, डॉ. संध्या डांगे, डॉ. सुभाष हुलपल्ले, डॉ. आप्पासाहेब सूर्यवंशी, डॉ. नागोराव बोईनवाड, डॉ. महादेव कलशेट्टी, डॉ.अरुण बाबा, डॉ. दिनकर बिराजदार आदींनी पुढाकार घेऊन वृक्षारोपण केले. नगर परिषदेच्या वृक्षारोपणात स्वयंसेवक आशिष राठोड, सुरेश माने, वर्षा राठोड, अंकिता राठोड, मेघा पवार, बबलू पवार, महेश राठोड आदींनी पुढाकार नोंदवला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. प्रतापसिंग राजपूत यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. शिला स्वामी तर आभार प्रा. अशोक बावगे यांनी मानले. यावेळी महाविद्यालयातील विविध शाखेचे विद्यार्थी-विद्यार्थिनी बहुसंख्येने उपस्थित होत्या.

# दोन्ही शिवसेना एकत्र येतील अशी आशा : अंबादास दानवे



**मुंबई** : शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते आणि विधान परिषदेचे विरोधी पक्ष नेते अंबादास दानवे यांनी दोन्ही शिवसेना एकत्र येण्याबाबत मोठे विधान केले आहे. शिवसेना फुटल्याची खंत असून, दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात, अशी आशा असल्याचे ते म्हणालेत. शिवसेना म्हणून आपण एकत्र असले पाहिजे, शिवसेनेची एकत्रित ताकद राज्याला दिसली पाहिजे, असेही त्यांनी म्हटले. एकीकडे दोन्ही ठाकरे बंधू एकत्र येण्याची चर्चा सुरू असताना दुसरीकडे दोन्ही शिवसेना एकत्रित येण्याची अपेक्षा अंबादास दानवे यांनी केली.

अंबादास दानवे यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ ऑगस्टमध्ये संपत आहे. या पार्श्वभूमीवर नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनात त्यांचा निरोप समारंभ पार पडला. दानवेंच्या निरोप समारंभाच्या भाषणात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांची एकमेकांवरील टोलेबाजी पाहायला मिळाली. तसेच अंबादास दानवे यांच्या निरोप समारंभाच्या फोटोसेशन वेळी उद्धव ठाकरे आणि एकनाथ शिंदे यांनी एकमेकांकडे पाहणे टाळले होते आणि बाजूला बसणे देखील टाळले होते. आता अंबादास दानवेंच्या उपरोक्त विधानामुळे राज्याच्या राजकारणात नव्या चर्चा सुरू झाल्या आहेत.

अंबादास दानवे यांनी 'एबीपी माझा'ला नुकतीच मुलाखत दिली. यावेळी त्यांना दोन्ही शिवसेना एकत्र याव्यात असे तुम्हाला वाटते का? असा प्रश्न विचारण्यात आला. त्यावर उत्तर देताना अंबादास दानवे म्हणाले, "मी तेवढा मोठा नाहीये. पण निश्चित मी त्यादिवशी सुरुवातीलाच म्हटले की, मनाला वेदना झाल्या. जी संघटना अखंड ताकदवान होती, ठीक आहे, सत्तेत बसणे वगैरे, आम्ही काय सत्तेसाठी जन्माला आलेलो नाहीत. सत्ता येईल आणि जाईल. पण जी संघटना फुटली त्याच्या वेदना मनाला आणि हृदयाला झालेल्याच होत्या. या वेदना कधी ना कधी भरुन निघाव्यात असे मनाला वाटत असते.

अंबादास दानवे पुढे म्हणाले, सगळे एकत्र असले पाहिजे. सगळे लोकं असले पाहिजेत. कारण आपली शिवसेनेचे राज्य असले पाहिजे. आपली महाराष्ट्रात ताकद असली पाहिजे, असे मला शिवसैनिक म्हणून वाटतंच. आशा ठेवायला काही हरकत नाही.

"मी कुणाविषयी वैयक्तिक सल ठेवणार नाही. पण मनाला ही सल कायम आहे की, आपली एवढी मजबूत संघटना कुणीतरी फोडली. तिला कुणाची तरी दृष्ट लागली. संघटना तेवढीच मजबूत व्हावी हीच माझी इच्छा आहे", असेही अंबादास दानवे म्हणाले.

दरम्यान, अंबादास दानवे यांचा विधानपरिषदेतील आमदारकीचा काळ संपुष्टात येणार आहे. ते शिवसेनेचा आक्रमक नेता म्हणून ओळखले जातात. अलीकडच्या काळात ठाकरे गटाची भूमिका ठाम आणि जोरकसपणे मांडणाऱ्या प्रमुख नेत्यांमध्ये त्यांचा समावेश होता. आता ते विधान परिषदेचे सदस्य राहणार नसल्यामुळे, आगामी काळात ठाकरे गटाला त्यांच्या सारख्या आक्रमक नेत्याची कमतरता भासू शकते. सद्यस्थितीत ठाकरेंच्या शिवसेनेकडून विधान परिषदेवर पुन्हा आमदार म्हणून निवडून येणे शक्य आहे का? यावर सध्या जोरदार चर्चा सुरू आहे. अंबादास दानवे यांना पुन्हा त्याच जागेवर निवडून येण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका होणे आवश्यक आहे.

छत्रपती संभाजीनगर आणि जालना येथील महापालिका, जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या निवडणुका झाल्यानंतरच संबंधित विधान परिषदेच्या जागेसाठी निवडणूक होणार आहे. तोपर्यंत अंबादास दानवे यांना प्रतीक्षा करावी लागणार आहे. विधान परिषदेच्या काही जागांचा कार्यकाळ 2026 मध्ये पूर्ण होणार आहे. मात्र, जर विधानसभा सदस्यांमार्फत निवडून येण्याचा पर्याय विचारात घेतला, तर ठाकरेंच्या शिवसेनेकडे केवळ 20 आमदारांचे संख्याबळ असल्यामुळे तो मार्ग कठीण आहे. विधान परिषदेसाठी आवश्यक असलेल्या 40 ते 45 आमदारांच्या पाठिंब्याशिवाय ही निवडणूक शक्य नाही. त्यामुळे अंबादास दानवे यांना पुन्हा विधान परिषदेवर येण्यासाठी काही काळ वाट पाहावी लागणार आहे.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० जुलै २०२५


## डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेची स्थापना



**पाचोड :** डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ अंतर्गत कार्यरत अशासकीय महाविद्यालयीन प्राचार्य संघटनेच्या नवीन कार्यकारिणीची निवड करण्यात आली. डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ क्षेत्रातील प्राचार्यांच्या समस्या, धोरणात्मक निर्णयांमध्ये सहभाग आणि प्रशासकीय अडचणी सोडवण्यासाठी अशासकीय प्राचार्यांची स्वतंत्र संघटना स्थापन करण्यात यावी. या विचारांच्या पार्श्वभूमीवर प्राचार्य फोरम कार्यान्वित करण्यासाठी व संघटनेची औपचारिक स्थापना करण्यासाठी पहिली बैठक विद्यापीठ नाट्यगृहात १७ जून, २०२५ सभागृहात आयोजित करण्यात आली होती. यामध्ये प्राचार्य संघटनेचा पाया घालण्यासाठी प्रारंभिक निर्णय घेण्यात आले.

त्यानंतर दुसरी महत्त्वपूर्ण बैठक दिनांक 29 जून, 2025 रोजी मिलिया महाविद्यालय, बीड येथे आयोजित करण्यात आली. या बैठकीत निवृत्त व दिवंगत कार्यकारिणी सदस्यांच्या जागी नवीन सदस्य नियुक्त करण्याचा ठराव संमत करण्यात आला. तसेच, जिल्हानिहाय रिक्त पदांवर त्या-त्या जिल्ह्यांतील प्राचार्यांना संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला.

वरील ठरावाच्या अनुषंगाने 13 जुलै, 2025 रोजी शिवछत्रपती महाविद्यालय, पाचोड येथे संघटनेची तिसरी बैठक पार पडली. यामध्ये जिल्हानिहाय नवीन पदाधिकारी आणि सदस्यांची निवड करण्यात आली. या बैठकीत खालील नूतन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.अध्यक्ष — डॉ. विजय एन. भोसले, प्राचार्य, शिवाजी विद्यालय, कन्नडउपाध्यक्ष — डॉ. हरिदास विधाते, प्राचार्य, आनंदराव धोंडे महाविद्यालय, कडासचिव - डॉ. सोपान निंभोरे -प्राचार्य, ॲड. हंबर्डे महाविद्यालय, आष्टीजिल्हा निहाय नवनियुक्त कार्यकारणी सदस्य : धाराशिव - डॉ. प्रशांत चौधरी, डॉ. हरिदास फेरे (सहसचिव), बीड - डॉ. शिवदास शिरसाठ, अंबाजोगाई, डॉ. मोहम्मद ईलीयास, जालना - डॉ. रामेश्वर पवार,अंबड डॉ. सुनंदा तिडके, डॉ. भारत खंदारे (कोषाध्यक्ष) लालबहादूर शास्त्री महाविद्यालय, परतुर. छत्रपती संभाजीनगर - डॉ. चंद्रसेन कोठावळे, डॉ. अशोक पंडित, डॉ. मजहर फारुकी आदींचे निवड करण्यात आली आहे.

या निवडीनंतरच्या बैठकीत पुढील महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. 1) जिल्हानिहाय संघटना नव्याने बांधणे 2) नवीन प्राचार्यांना नेतृत्वाची संधी देणे. 3 ) विद्यार्थ्यांच्या अडचणी, शैक्षणिक वातावरण आणि दैनंदिन प्रशासनातील समस्या यावर सामूहिक निर्णय घेणे. 4) मा.कुलगुरू महोदय यांच्याशी समन्वय साधून विद्यापीठ व महाविद्यालय यांच्यातील शैक्षणिक विकासासाठी नियोजनबद्ध कार्यवाही करणे. आदी निर्णय घेण्यात आले.

निवडीनंतर बोलताना नवनिर्वाचित अध्यक्ष प्राचार्य डॉ. विजय भोसले यांनी संघटनेच्या माध्यमातून प्राचार्यांच्या समस्या सोडवण्यासाठी कटिबद्ध राहणार असून, कार्यकक्ष विस्तारण्यावर भर दिला जाईल, असे सांगितले. यावेळी प्राचार्य डॉ. भारत खंदारे, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्राचार्य डॉ. चंद्रसेन कोठावळे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्राचार्य महासंघाच्या नवनियुक्त पदाधिकारी यांचा शिवछत्रपती महाविद्यालयाच्या वतीने यथोचित सत्कार करण्यात आला.

## कुणी कुणासोबत जावा



कुणी कुणासोबत जावा
हा ज्याचा त्याचा प्रश्न
विचार सोडून काम करणं
म्हणजे जनतेच्या विश्वासाला तडा देणं

भोळीभाबडी ही जनता
तुमच्यासाठी जीव की प्राण देते
थोड्याशा स्वार्थासाठी मात्र
पाठीत खंजीर खुपसणं योग्य नसतं

ज्या महापुरुषांचे तुम्ही वारसदार
त्यांनी माणसासाठी सारं आयुष्य वेचले
पद, प्रतिष्ठेसाठी तुम्ही
त्यांचे इमान वेशीला टांगले ?

देशाचे संविधान लिहून त्यांनी
जनावरांनाही माणूस केलं
संविधान मोडतोड करणाऱ्यासोबत तुम्ही
जीवाची लाही लाही होत आहे

जे कधीही घडणार नाही
ते तुम्ही घडवले
गुलामीतून बाहेर काढलेल्यांना
पुन्हा गुलामीत तुम्ही ढकलणार ?

तुमच्यासाठी अन घराण्यासाठी
अनुयायी कुर्बानी द्यायला तयार आहेत
सत्तेसाठी लाचार तुम्ही
महापुरुषांचा अपमान करीत आहात

जात, धर्म, विषमतेसाठी ज्यांनी लढे दिले
हा इतिहास तुम्ही विसरलात ?
पुन्हा त्याच जातीयवाद्यांसोबत
हात मिळवली करत आहात

ज्यांनी सत्तेचा दुरूपयोग करून
शिक्षण,नोकरी, आरक्षण सारं बंद केले
त्यांच्यापुढे लोटांगण कशासाठी?
काय वाटत असल त्यांना ...साहेबांना

सारेच्या सारे अनुयायी
अस्वस्थ आहेत तुमच्या कृतीने
बाबासाहेबांच्या चळवळीचा रथ
कुठे नेऊन ठेवाल तुम्ही?


**प्रा. डॉ. सतीश मस्के**
**पिंपळनेर, धुळे**
**मो. 75075 04046**



डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.



बहुउद्देशीय आरोग्य कर्मचारी (MPW), आरोग्य निरीक्षक, आरोग्य पर्यवेक्षक, स्वच्छता निरीक्षक
या पदासाठी आवश्यक असलेला शासनमान्य

Sanitary Health Inspector
सॅनेटरी हेल्थ इन्स्पेक्टर
या कोर्ससाठी प्रवेश चालु आहेत

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ,पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)
9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० जुलै २०२५


## नांदेडमध्ये एक लाख रुपयांसाठी लग्नाच्या बाराव्या दिवशीच नवविवाहितेला विष पाजून मारले




**नांदेड :** हुंड्यातील १ लाख रुपये न आणल्याने सासरच्या लोकांनी नवविवाहितेला लग्नानंतर अवघ्या १२ दिवसांनी विष पाजून मारले. राठोडवाडी (अखरगा) (ता.मुखेड) येथे १३ जुलैला ही घटना घडली. ताऊबाई सुधाकर राठोड (१८) असे मृत नवविवाहितेचे नाव आहे. याप्रकरणी पतीसह सासरा, सासू व दिरावर गुन्हा दाखल झाला. पती सुधाकरला अटक केली आहे. वसूर तांडा येथील वामन चव्हाण यांची मुलगी ताऊबाई हिचे लग्न राठोडवाडी (अखरगा) येथील सुधाकर राठोडसोबत २ जुलैला झाले.

लग्नात ६ लाख रुपये हुंडा व ३ तोळे सोने देण्याचे ठरले होते. मुलीचे वडील वामन चव्हाण यांनी लग्नावेळी ५ लाख रुपये हुंडा, एक तोळ्याची अंगठी व २ तोळ्यांचे लॉकेट दिले. लग्नानंतर मुलगी व जावयास परतणीसाठी बोलावले होते. त्या वेळी सुधाकरने हुंड्याचे राहिलेले १ लाख घेऊन ये, मला दूध डेअरी टाकायची आहे, अशी धमकी ताऊबाईला दिली. नंतर ती ९ जुलैला सासरी गेली.

त्यानंतर १० जुलैला सकाळी ७ वाजता ताऊबाईला उलट्या होत आहेत, लवकर या, असा निरोप मुलीच्या वडिलांना दिला. त्याप्रमाणे वामन चव्हाण मुलीच्या सासरी गेले. त्यानंतर ताऊबाईला मुखेडमध्ये प्राथमिक उपचार करून नांदेडला व तेथून हैदराबादला हलवले. मात्र, उपचार सुरू असताना १३ रोजी सायंकाळी ६ वा. तिचा मृत्यू झाला. याप्रकरणी मुलीचे वडील वामन चव्हाण (रा.वसूर तांडा) यांच्या तक्रारीवरून मुखेड पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. पती, सासरा, सासू आणि दीर यांनी मला जबरदस्तीने विष पाजल्याचे ताऊबाईने मृत्यूपूर्वी १२ जुलैला सांगितले होते. त्यानंतर १३ जुलैला सायंकाळी हैदराबाद येथील खासगी रुग्णालयात तिचा मृत्यू झाला.

## शासकीय नोकरीसाठी तिसरे अपत्य अडथळा ठरले : बापाने मुलीला एका लाखात विकले




**नांदेड :** शासकीय नोकरी मिळवण्यासाठी एका पित्याने आपल्या तिसऱ्या मुलीला दुसऱ्याला देऊन टाकल्याचा धक्कादायक प्रकार नांदेड जिल्ह्यात उघडकीस आला आहे. नोकरीस अडथळा ठरेल या भीतीने एका बापाने स्वतःच्या मुलीचा सौदा केल्याचा आरोप पत्नीने केला असून, पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

नांदेड येथील रहिवासी सुरेखा यांचा विवाह 2009 साली गजानन वांजरखेडे यांच्याशी झाला होता. या दाम्पत्याला एक मुलगा आणि दोन मुली आहेत. 2011 मध्ये गजानन यांचे वडील निधन पावले. त्यानंतर गजानन यांना अनुकंपा तत्वावर 2018 मध्ये हिंगोली येथील दुय्यम उपनिबंधक कार्यालयात शिपाई पदाची नोकरी लागणार होती. मात्र, सरकारी नोकरी मिळवण्यासाठी फॉर्ममध्ये 'तिसरं अपत्य नाही' असा उल्लेख आवश्यक असल्यामुळे गजानन याने आपल्या तिसऱ्या मुलीला दुसऱ्या कुटुंबाकडे सोपवण्याचा विचार होता. पत्नीने याला विरोध केला. त्यामुळे गजाननने तिलाही घराबाहेर हाकलून दिले. सुरेखा यांनी पुढील काही वर्षे मजुरी करून आपला उदरनिर्वाह केला.

सुरेखा यांना काही महिन्यांपूर्वी आपल्या तिसऱ्या मुलीबाबत माहिती मिळाली की, ती एका नातेवाईकाच्या घरी राहत असून तिच्या कागदपत्रांवर वडिलांचे नाव गजानन नव्हे, तर दुसऱ्याच व्यक्तीचे आहे. या माहितीची खातरजमा करण्यासाठी सुरेखा यांनी एका वकिलांशी संपर्क साधल्यानंतर त्यांना निराधार महिलांना मदत करणाऱ्या एनजीओबद्दल माहिती मिळाली. या एनजीओने मुलगी राहत असलेल्या गावात जाऊन तपास केला. शाळेतील कागदपत्रे आणि जन्म प्रमाणपत्रांची तपासणी केल्यानंतर मुलीच्या वडिलांच्या नावात गोंधळ आढळून आला. ही सगळी माहिती मिळाल्यानंतर सुरेखा यांनी नांदेडच्या भाग्यनगर पोलिस ठाण्यात पतीविरुद्ध तक्रार दाखल केली.

माझ्या मुलीला एक लाख रुपयात विकल्याचा आरोप महिलेने केला आहे. माझ्या मुलांना माझ्याकडे सोपवण्यात यावे आणि पतीविरुद्ध कडक कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे. पोलिसांनी याप्रकरणी गुन्हा दाखल केला असून तपास करत आहेत.

## वैष्णवीच्या आत्म्याचा, तिच्या लहान बाळाचा विचार करा; रोहिणी खडसेंचा सरकारवर हल्लाबोल



**जळगाव :** वैष्णवी हगवणे मृत्यू प्रकरणी विधिमंडळाच्या महिला व बालहक्क समितीने चौकशी अहवाल सादर केला असून, वैष्णवीचा मृत्यू फक्त आत्महत्या नसून कौटुंबिक हिंसाचार व हुंड्याच्या छळातून उद्भवलेली हुंडाबळी असल्याचे नमूद करण्यात आले आहे. समितीच्या या अहवालावरून राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या महिला प्रदेशाध्यक्ष रोहिणी खडसे यांनी सरकारवर तीव्र शब्दांत हल्ला चढवला आहे. शासनाला जनाची नाही तर मनाची असेल तर वैष्णवीच्या आत्म्याचा आणि तिच्या लहान बाळाचा विचार करा, अशा शब्दांत आपला संताप व्यक्त केला आहे.

वैष्णवी हगवणे आत्महत्या प्रकरणाची चौकशी करण्यासाठी सरकारच्या वतीने आमदार मोनिका राजळे यांच्या अध्यक्षतेखाली एक समिती स्थापन करण्यात आली होती. या समितीने शुक्रवारी विधानसभेत आपला अहवाल सादर केला. या अहवालात तपास प्रक्रियेत गंभीर त्रुटी असल्याचे नमूद केले आहे. हा प्रकार केवळ आत्महत्येचा नसून, हे प्रकरण स्पष्टपणे कौटुंबिक अत्याचार, हुंडाबळी व अमानुष छळाचे असल्याचे समितीने स्पष्ट केले आहे. समितीच्या अहवालावरून रोहिणी खडसे यांनी सोशल मीडियावर पोस्ट करून सरकारला धारेवर धरले आहे.

*वैष्णवी हगवणे प्रकरणात पोलिसांकडून कारवाईची अपेक्षा असताना पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. असं मी म्हणत नाही तर आ. मोनिका राजळे यांच्या अध्यक्षतेखाली सरकारने स्थापन केलेली समिती म्हणत आहे.*

*काल विधानसभेत या समितीने आपला अहवाल सादर केला. त्यात म्हटले आहे की, सुपेकर आणि त्यांच्या कुटुंबावर कारवाई करावी आणि त्याची माहिती समितीला द्यावी, असे स्पष्ट निर्देश समितीने गृह विभागाला दिलेले होते. मात्र, हा अहवाल विधानसभेत सादर होईपर्यंत कोणतीही माहिती समितीला दिली गेली नाही.*

*अरे कुणाला मूर्ख बनवता? सध्या पोलिस सत्ताधाऱ्यांच्या इशाऱ्यावर नाचत आहेत. असे असताना 'आपल्याच' माणसांवर का कारवाई करतील? मी आधीच म्हटले होते, प्रकरण ताजे असेपर्यंत आम्ही काहीतरी करतोय असे दाखवले जाईल, प्रकरण शांत झाले की आरोपींना व्हिआयपी ट्रिटमेंट दिली जाईल आणि तसंच घडतंय!*

*शासनाला जनाची नाही तर मनाची असेल, तर वैष्णवीच्या आत्म्याचा विचार करा, तिच्या लहान बाळाचा विचार करा?* असे रोहिणी खडसे यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले आहे.




महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), रविवार २० जुलै २०२५


# वैजापूरच्या शिरूरमध्ये भोंदूबाबाचा पर्दाफाश



**छत्रपती संभाजीनगर :** अंधश्रद्धा निर्मुलन समितीने वैजापूरच्या शिरूर येथील एका भोंदूबाबाचा पर्दाफाश केला आहे. हा भोंदूबाबा दारू सोडवण्यासाठी येणाऱ्या लोकांना बूट तोंडात धरण्यासाठी देत होता. एवढेच नाही तर या प्रकरणी महिलांना चुकीचा स्पर्शही करत होता, असा आरोप आहे. या प्रकरणी पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पुढील तपास सुरू आहे.

यासंबंधीच्या वृत्तानुसार, संजय रंगनाथ पगार (50) असे या भोंदूबाबाचे नाव आहे. तो शिरूरच्या बिरोबा मंदिरात आपला दरबार भरवत होता. तो लोकांची दारू सोडवण्याचा दावा करत होता. यासाठी आपल्याकडे येणाऱ्या लोकांना तो आपले मूत्र द्यायचा. तसेच भूत उतरवण्याच्या नावाखाली तोंडात बूट धरण्यासही द्यायचा. यासंबंधीचा एक व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर एकच खळबळ माजली आहे. या प्रकरणी शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस कर्मचारी किशोर शांताराम आगळे यांनी सरकारतर्फे ही तक्रार दाखल केली.

या तक्रारीनुसार, सदर भोंदूबाबा वेगवेगळ्या समस्यांनी वेढलेल्या नागरिकांना शोधून त्यांच्यावर अघोरी प्रकार करत होता. गुरूवारी दुपारी 1 च्या सुमारास या बाबाने एका तरुणावर अघोरी कृत्य केले. यासंबंधीच्या एका व्हिडिओत दिसत आहे की, भोंदूबाबा मंदिरात बसून एका तरुणाव भंडारा टाकून त्याच्या नाकाला बूट लावताना दिसत आहे. यावेळी तो काही मंत्रोच्चार करतानाही दिसून येत आहे. दुसऱ्या एका व्हिडिओत हा बाबा तरुणाला झोपवून त्याच्या मानेवर पाय व पोटावर पाय ठेवून उपचार करण्याचे ढोंग करताना दिसून येत आहे. यावेळी तो सोड त्याला सोड त्याला नाही तर दोस्ती घालेन, असे म्हणतानाही दिसून येत आहे. अंधश्रद्धा निर्मुलन समितीचे सदस्य रितेश संतोष होळकर, जगदीश सोज्वळ यांनी या घटनेचा पर्दाफाश केला.

भोंदूबाबा संजय रंगनाथ पगार हा पूर्वी लग्नाच्या वरातीत घोडे पुरवण्याचे काम करत होता. पण त्यातून फारसे उत्पन्न मिळत नसल्यामुळे त्याने तो व्यवसाय सोडला. त्यानंतर गत काही दिवसांपासून तो शिरूर येथील बिरोबा मंदिरात येत होता. मंदिरात आपापल्या समस्या घेऊन येणाऱ्या लोकांना शोधून त्यांना तो आपल्या जाळ्यात अडकवायचा. तो लोकांना अघोरी सल्ले देऊ लागला. त्यानंतर त्याने मंदिरात आपला दरबारही भरवण्यास सुरूवात केली. रविवार व गुरूवार असे दोन दिवस तो आपला दरबार भरवायचा. पण आता गुन्हा दाखल झाल्यामुळे त्याच्या अडचणींत वाढ होण्याची शक्यता आहे.

अंधश्रद्धा ही समाजातील एक गंभीर समस्या आहे. ती वैज्ञानिक दृष्टिकोन आणि तर्कसंगत विचारांना आव्हान देते. अनेकदा अज्ञान, भीती किंवा परंपरांवर आधारित अंधश्रद्धा लोकांना चुकीच्या विश्वास व प्रथांमध्ये अडकवतात. यामुळे त्यांचे शारीरिक, मानसिक व आर्थिक शोषण व नुकसान होऊ शकते. उदाहरणार्थ, जादूटोणा, भूतपिशाच्च यासारख्या समजुतींमुळे लोक वैद्यकीय उपचारांऐवजी अंधविश्वासांवर अवलंबून राहतात. यामुळे गंभीर आजार बळावतात. याशिवाय, अंधश्रद्धेमुळे सामाजिक भेदभाव व अन्यायालाही प्रोत्साहन मिळते. विशेषतः महिला या प्रकरांना फार बळी ठरतात. ही समस्या दूर करण्यासाठी शिक्षण, जागरूकता व वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रसार आवश्यक आहे, जेणेकरून समाज तर्कनिष्ठ व प्रगतिशील बनू शकेल.

# राज ठाकरेंविरोधात सुप्रीम कोर्टात पीआयएल



**मुंबई :** मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांच्याविरोधात सर्वोच्च न्यायालयात जनहित याचिका दाखल झाली आहे. या याचिकेद्वारे त्यांच्यावर हिंदी भाषिकांविरोधात हिंसाचाराला खतपाणी घालण्यासह द्वेष पसरवण्याचा आरोप करण्यात आला आहे. या याचिकेमुळे राज ठाकरे यांच्या अडचणी वाढण्याची शक्यता आहे.

गत काही महिन्यांपासून महाराष्ट्रात हिंदीच्या सक्तीवरून मोठा वाद निर्माण झाला आहे. राज व उद्धव ठाकरे यांनी या निर्णयाला विरोध केल्यानंतर सरकारने यासंबंधीचा जीआर रद्दबातल केला. पण त्यानंतरही ठाकरे व सत्ताधारी भाजपच्या नेत्यांमध्ये या प्रकरणी आरोप प्रत्यारोपाच्या फैरी झडत आहेत. राज यांनी शुक्रवारी यासंबंधी मीरा भाईंदर येथे एक सभा घेतली होती. त्यात त्यांनी अमराठी नागरिकांना मुंबईत शांततेत व्यापार व्यवसाय करण्याचा इशारा दिला होता. मराठी व्यापारी नाहीत का? महाराष्ट्रात राहायचे असेल त मराठी शिका, नीट व्यापार करा. मस्ती दाखवली, तर दणका बसणार म्हणजे बसणार, असे ते म्हणाले होते.

त्यांच्या या इशाऱ्यानंतर हिंदी भाषिक नेत्यांनी त्यांच्यावर टीकेची झोड उठवली असताना आता थेट सर्वोच्च न्यायालयात या प्रकरणी याचिका दाखल करण्यात आली आहे. वकील घनश्याम उपाध्याय यांनी ही याचिका दाखल केली आहे. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणाद्वारे हिंदी भाषिक लोकांविरोधात हिंसाचार भडकवण्याचा व द्वेष पसरवण्याचा प्रयत्न केला. यामुळे महाराष्ट्रात भाषेच्या मुद्यावरून तणाव वाढवल्याप्रकरणी राज यांच्यासह मनसेच्या कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल करण्यात यावा, अशी मागणी या याचिकेद्वारे करण्यात आली आहे.

राज ठाकरे यांच्या भाषणांमुळे लोकांना रस्त्यावर येण्याची प्रेरणा मिळते आणि त्यानंतर हिंदीला विरोध म्हणून मराठी न बोलणाऱ्या किंवा इतर राज्यांमधून आलेल्या लोकंवर मराठी लादण्यात येते, असा आरोपही या याचिकेत करण्यात आल्याचा दावा आयएएनएसने आपल्या वृत्तात म्हटले आहे.

उल्लेखनीय बाब म्हणजे राज ठाकरे यांच्याविरोधात 3 वकिलांनी नुकतीच पोलिस महासंचालकांकडे तक्रार दाखल केली होती. या तक्रारीत राज यांची काही विधाने सामाजिक अशांततेला प्रोत्साहन देणारी तथा सामाजिक सलोखा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणारी असल्याचा दावा करण्यात आला होता. या प्रकरणी त्यांच्यावर राष्ट्रीय सुरक्षा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणीही करण्यात आली होती.

राज ठाकरे यांची शुक्रवारी मीरा भाईंदर येथे सभा झाली. त्यात त्यांनी मराठीच्या मुद्यावरून भाजप खासदार निशिकांत दुबे यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. भाजपचा दुबे नावाचा एक कोणता तरी खासदार म्हणाला, मराठी लोकांना आम्ही पटकून पटकून मारू. त्याच्यावर केस झाली का? हिंदी चॅनलवाल्यांनी त्यांचे चालवले का? त्याचे वक्तव्य दाखवले का? काहीही नाही. बघा हे कसे असतात. तू आ म्हाला पटक पटक के मारणार? मी दुबेला सांगतो. तुम मुंबई आ जाओ. मुंबई के समंदर में डुबे डुबे कर मारेंगे, असे राज ठाकरे म्हणाले होते.


बातम्या व जाहिरातीसाठी संपर्क 7588005002

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे.
कृपया दुपारी 12 ते रात्री 8 या वेळेत संपर्क करा.
संपर्क क्र. 7588005002

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर
साहिल कॉम्प्युटर्स ॲण्ड मल्टी सर्व्हिसेस
डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग
विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103